जा.क्र./वि.शा./निवडणूक/११२५/२०१७
पोलीस सह आयुक्त पुणे शहर,यांचे कार्यालय,
पुणे,दिनांक :-२० /०२/२०१७.

**विषय :- क्रिमिनल प्रोसिजर कोड १९७३ चे कलम १४४ प्रमाणे आदेश.**

**आदेश**

निवडणूक आयोग, महाराष्ट्र राज्य यांनी पुणे व पिंपरी-चिंचवड महानगरपालिका तसेच जिल्हा परिषद व पंचायत समिती सार्वत्रिक निवडणूक-२०१७ साठी दिनांक ११/०१/२०१७ पासुन मतमोजणी प्रक्रिया पुर्ण होईपर्यत आचारसंहिता लागू केली आहे.सदर निवडणुक मतदानाची मतमोजणी दिनांक २३/०२/२०१७ रोजी खालील नमूद केलेल्या ठिकाणी होणार आहे.

**पुणे मनपा निवडणूक २०१७ मतमोजणी ठिकाणे**

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | निश्चित करण्यात आलेले मतमोजणी ठिकाण |
|---|---|---|
| १ | ८,९. | पुरंदर बहुउद्देशीय केंद्र, सकाळनगर, बाणेररोड, पुणे |
| २ | ७,१४,१६. | बालेवाडी स्टेडीयम(बॅडमिंटन हॉल),पुणे. |
| ३ | १०,११,१२. | एम आय टी शाळा,(३ रा मजला) पुण्याई सभागृहासमोर, पौडरोड, कोथरुड, पुणे. |
| ४ | १३,३१,३२. | पंडीत दीनदयाळ उपाध्याय विद्या मंदीर,अभिनव शाळेमागे पौडफाटा कर्वेरोड, पुणे |
| ५ | १,२,६. | एफ.सी.आय. गोडावून नं.८ ब,कोरेगाव पार्क,पुणे |
| ६ | ३,४,५. | कै.भिकू राजाराम पठारे प्राथमीक शाळा,खराडीगाव (इंन्डोअर स्टेडीयम) पुणे. |
| ७ | १८,१९,२०. | अब्दुल कलाम हॉल,बर्निग घाटरोड, बंडगार्डन,कोरेगाव पार्क पुणे |
| ८ | १५,१७,२९. | डी.ई.एस. इंग्लिश मिडीयम स्कूल, टिळक रोड, पुणे |
| ९ | ३०,३३,३४. | सर परशुराम महाविद्यालय येथील लेडीज हॉल टिळकरोड पुणे |
| १० | २८,३५,३६. | गणेश कला क्रिडा मंच, प्रदर्शन हॉल,स्वारगेट पुणे. |
| ११. | २७,३७,४१. | कै.बाबुराव सणस ग्राउंड,सारसबाग शेजारी पुणे |
| १२. | ३८,३९,४०. | धनकवडी महापालीका सहायक आयुक्त कार्यालय,कै.हपभ माधवराव शंकरराव कदम भवन सर्वे नं.१३० ते १३३ प्लॉट क्रं.एफ.राजीव गांधी प्राणी सग्रहालया समोर, पीएमपीएमएल बसडेपो लगत, काळूबाई मंदीर मागे पुणे सातारोड कात्रज पुणे. |
| १३. | २१,२२,२३. | साधना विद्यालय, माळवाडी हडपसर पुणे |
| १४. | २४,२५,२६. | सावित्रीबाई शिवरकर बहुउद्देशीय हॉल तळमजला शिवरकररोड म.फुले सास्क्रुतीक भवन शेजारी वानवडी पुणे. |

**पिंपरी चिंचवड मनपा निवडणूक २०१७ मतमोजणी ठिकाणे**

| अ.क्र. | प्रभाग क्रमांक | निश्चित करण्यात आलेले मतमोजणी ठिकाण |
|---|---|---|
| १ | १,२,११. | स्वामी विवेकानंद क्रिडा संकुल,स्पाईनरोड कृष्णानगर,सेक्टर नं.१८,चिंखली |
| २ | ३,६,८. | संत ज्ञानेश्वर क्रिडा संकुल,इंद्रायणीनगर भोसरी पुणे-२६. |
| ३ | ४,५,७. | कै. अंकुशराव लांडगे नाट्यगृह, भोसरी पुणे-२६. |
| ४ | ९,१०,२०. | क प्रभाग कार्यालय,एम.आय.डी.सी. भोसरी पुणे-२६. |
| ५ | १२,१३,१४. | आण्णाभाऊ साठे सांस्कृतिक भवन,प्राधिकरण सेक्टर-२३ यमुनानगर, निगडी पुणे |
| ६ | १५,१६,१७. | डॉ. हेडगेवार भवन,प्राधिकरण, सेक्टर नं.२६,निगडी पुणे-४४. |
| ७ | १८,१९,२०. | ब प्रभाग क्षेत्रीय कार्यालय,लिंकरोड चिंचवड पुणे-३३. |
| ८ | २२,२३,२७. | नविन मनपा शाळा इमारत,थेरगाव करसंकलन कार्यालयाशेजारी,थेरगाव पुणे |
| ९ | २४,२५,२६. | ड प्रभाग कार्यालय, सांगवीफाटा रहाटणी पुणे-१७. |
| १० | २८,२९,३०. | साई शारदा महिला आय.टी.आय,कासारवाडी पुणे-३४. |
| ११. | ३१,३२. | पिंपरी-चिंचवड बॅडमिटन हॉल,पी.डब्लू.डी. मैदान सांगवी पुणे-२७. |

## हवेली तालुका जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुक मतमोजणी ठिकाण

| अ.क्र. | निश्चित करण्यात आलेले मतमोजणी ठिकाण |
|---|---|
| १ | शिवाजीनगर धान्य गोदाम , शिवाजीनगर पुणे-४११००५. |

वरील ठिकाणी मतमोजणी प्रक्रिया सुरळीत व शांततेत पार पडण्यासाठी पोलीस आयुक्तालयाचे कार्यक्षेत्रात कायदा व सुव्यवस्था राखणेकामी सार्वजनिक मालमत्तेच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने तसेच उपद्रव टाळण्यासाठी वरील नमूद केलेल्या मतमोजणी ठिकाणां पासून **२०० मीटर** परिसरात निर्बंध घालणे जरुरीचे आहे. अशी माझी खात्री झालेली आहे.

त्याअर्थी, मी सुनिल रामानंद, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मला फौजदारी दंड प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा आदेश देतो की, वर नमूद केलेल्या मतमोजणी ठिकाणांपासून **२००** मीटर परिसरात दिनांक २३/०२/२०१७ चे ००.०१ वा. पासून ते मतमोजणी प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

१) मतमोजणीच्या परिसरात अधिकृत वाहन व्यतिरिक्त इतर वाहन आत नेण्यास मनाई करण्यात येत आहे.

१) मतमोजणीच्या ठिकाणी प्रवेश पास शिवाय आतमध्ये प्रवेश करण्यास मनाई करण्यात येत आहे.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भा.दं.वि. कलम १८८ अन्वये शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश माझे सही शिक्यानिशी आज दि. /०२/२०१७ रोजी दिला आहे.